**ठळक बातम्या**

- डिसेंबरमधल्या चाचणी उड्डाणासाठी गगनयान सज्ज, व्योममित्र हा यंत्रमानवही पाठवला जाणार

- तिन्ही सेनादलांसाठी ७९ हजार कोटी रुपये किमतीच्या विविध शस्त्र आणि उपकरणं खरेदीच्या प्रस्तावांना संरक्षण मंत्र्यांची मान्यता

- बिहार विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रीपदासाठी महाआघाडीची राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांना पसंती

- ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय पुरुष संघ पराभूत, मालिकाही गमावली

**आणि**

- महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडविरुद्ध भारतीय सलामीवीराचं शतक, सामन्यात पावसाचा व्यत्यय

**<><><><><>**

भारताच्या गगनयान या मानवरहित अंतराळयानाच्या निर्मितीचं ९० टक्के काम पूर्ण झालं असून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ते चाचणी उड्डाणासाठी सज्ज आहे. इसरोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी आज बंगळुरूमधे पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. या उड्डाणात व्योममित्र हा यंत्रमानव यानातून पाठवला जाईल. २०२७ मधे गगनयानचं पूर्ण उड्डाण होणार असून त्यावेळी ३ भारतीय अंतराळवीर त्यातून प्रवास करुन परत पृथ्वीवर येतील. असं त्यांनी सांगितलं. निसार भूस्थिर उपग्रहाचं काम येत्या १० ते १५  दिवसात सुरु होईल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

संरक्षण अधिग्रहण परिषदेनं तिन्ही सेनादलांसाठी ७९ हजार कोटी रुपये किमतीच्या विविध खरेदी प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज परिषदेची बैठक झाली, त्यात या खरेदी प्रस्तावांना मान्यता दिली गेली.

याअंतर्गत भारतीय लष्करासाठी नाग क्षेपणास्त्र प्रणाली मार्क टू, नौदलासाठी जहाज आणि युद्धसामग्री वाहून नेणारी जहाजे, बंदूक, हवाई दलासाठीही लांब पल्ल्याची लक्ष्य भेदी प्रणाली आणि इतर प्रस्तावांना मंजुरी दिली आहे.

**<><><><>**

हिंद महासागर क्षेत्रातलं भारतीय नौदलाचं अस्तित्व हे मित्र राष्ट्रांसाठी दिलासादायक आणि या प्रदेशात अस्थिरता निर्माण करू इच्छिणाऱ्यांसाठी अस्वस्थता निर्माण करणारं असल्याचं केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत  झालेल्या नौदल कमांडर्स परिषदेला संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते.

ऑपरेशन सिंदूर हे भारताची इच्छाशक्ती आणि क्षमतेचं प्रतीक होतं, या मोहीमेदरम्यान नौदलानं बजावलेल्या प्रतिबंधात्मक भूमिकेमुळे पाकिस्तानला त्यांच्या बंदरात किंवा किनाऱ्याजवळ राहणं भाग पडलं, असं ते म्हणाले. या मोहीमेतून जगाला भारतीय नौदलाची परिचालन सज्जता, व्यावसायिक क्षमता आणि सामर्थ्याचं दर्शन घडल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आजही नवी दिल्लीत रेल्वे भवनातल्या वॉर रूमला भेट दिली आणि सणासुदीच्या काळात धावत असलेल्या विशेष गाड्यांच्या स्थितीगतीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांकडून  छठ पूजेच्या पार्श्वभूमीवर रेल्वेनं केलेल्या तयारीसंबंधीची माहितीही घेतली.

पुढचे चार दिवस नियमित गाड्यांव्यतिरिक्त दररोज सरासरी ३०० विशेष गाड्यांसह एकूण पंधराशे विशेष गाड्या चालवल्या जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

देशात मोठ्या प्रमाणात विकास होत असून बिहारचा त्यात मोठा हातभार असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. 'मेरा बूथ सबसे मजबूत' कार्यक्रमाच्या अंतर्गत बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कार्यकर्त्यांना ते आभासी माध्यमातून संबोधित करत होते. बिहारमध्ये नागरिकांना जंगलराज नको असल्यानं पुन्हा रालोआचं सरकार येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

बिहारमध्ये विधासभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या महाआघाडीनं राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री पदाचा उमेदवार म्हणून घोषित केलं आहे. पाटणा इथं आज महाआघाडीच्या सर्व सात घटक पक्षांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यावेळी काँग्रेसचे नेते आणि निवडणूक निरीक्षक अशोक गेहलोत यांनी ही घोषणा केली. महाआघाडी सत्तेत आली तर विकासशील इन्सान पार्टीचे प्रमुख मुकेश सहानी उपमुख्यमंत्री असतील अशी घोषणाही त्यांनी केली.

**<><><><>**

रोजगार मेळा मालिकेअंतर्गतचा १७ वा मेळा उद्या आयोजित केला जाणार आहे. या मेळ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देशभरातील ४० ठिकाणच्या ५१ हजारांपेक्षा जास्त उमेदवारांना नियुक्तीपत्रं वितरित करतील.

**<><><><>**

आगामी आसियान शिखर परिषदेत आपण दूरस्थ पद्धतीनं सहभागी होणार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कळवलं आहे. यासंदर्भात आपण मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याशी संवाद साधला असून, आसियानच्या

अध्यक्षपदासाठी त्यांचं अभिनंदन केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी जर्मनी दौऱ्यात आज जर्मनीच्या आर्थिक व्यवहार आणि ऊर्जा मंत्री कॅथरिना रिचे यांची बर्लिनमध्ये भेट घेतली. व्यापार, गुंतवणूक, संरक्षण क्षेत्रात दोन्ही देशातले संबंध आणखी दृढ करण्याबाबत दोन्ही नेंत्यानी चर्चा केली, असं गोयल यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारत युरोपियन संघ मुक्त व्यापार करारात जर्मनीच्या योगदानाबाबतही यावेळी चर्चा झाली.

<><><><>

सकाळी जोरदार तेजी नोंदवलेल्या देशातल्या शेअर बाजारांनी आज वर्षभरातल्या उच्चांकी पातळीला स्पर्श केला. मात्र गुंतवणूकदारांनी नफा काढून घेणं पसंत केल्यानं दिवसअखेर ही तेजी तितकीशी टिकू शकली नाही. तरी सलग सहाव्या सत्रात दोन्ही निर्देशांक वाढ नोंदवून बंद झाले. व्यवहारांच्या दरम्यान सेन्सेक्स ८५० हून अधिक अंकांनी वधारुन ८५ हजार ३०० च्या जवळ गेला होता. निफ्टीही सव्वा दोनशेहून अधिक अंकांनी वधारुन २६ हजार १०० अंकांच्या पार पोहोचला होता. दिवसअखेर सेन्सेक्स १३० अंकांची वाढ नोंदवून ८४ हजार ५५६ अंकांवर बंद झाला. निफ्टीही २३ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८९१ अंकांवर बंद झाला. माहिती तंत्रज्ञान, खासगी बँकांचे समभाग आज तेजीत होते. सोन्याचे दर आज तोळ्या मागे साडे पाचशे रुपयांनी घसरले तर चांदी किलोमागे १ हजार रुपयांनी स्वस्त झाली. त्यामुळं सोनं २२ कॅरेट तोळ्यामागे १ लाख २१ हजार रुपयांना तर चांदी किलोमागे १ लाख ५२ हजार ५०० रुपयांना विकली जात होती.

<><><><>

बँक खात्यांसाठी वारसदारांची नोंदणी करण्याची प्रक्रिया एक नोव्हेंबरपासून आणखी सुलभ होणार आहे. यात ४ व्यक्तींची वारसदार म्हणून नोंदणी करता येईल. त्यामुळं ठेवीदार आणि त्यांच्या वारसांचे दावे निकाली काढणं सोपं होणार आहे. बँकिंग कायद्यातल्या या संदर्भातल्या सुधारणांची अंमलबजावणी पुढच्या शनिवारपासून सुरू होणार असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं म्हटलंय.

**<><><><><>**

अमेरिकेनं आपल्या तेल उद्योगावर लावलेल्या नव्या निर्बंधांमुळे युक्रेनसोबतच्या युद्ध संपवण्याच्या राजनैतिक प्रयत्नांना बाधा पोहचली असल्याची प्रतिक्रिया रशियानं दिली आहे. रशियानं अशा निर्बंधांमुळे होणाऱ्या नुकसानीमधनं बाहेर निघण्याचे मार्ग याआधीच शोधले आहेत, मात्र या निर्बंधांमुळे रशियापेक्षा जागतिक अर्थव्यवस्थेचंच अधिक नुकसान होणार असल्याचं रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोवा यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

ॲडलेड इथं भारतासोबत झालेला दुसरा एकदिवसीय सामना, ऑस्ट्रेलियानं २ गडी आणि २२ चेंडू राखून जिंकला. या विजयासोबतच ऑस्ट्रेलियानं या तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतानं कर्णधार आणि सलामीवर शुभमन गील आणि विराट कोहलीला झटपट गमावलं. त्यानंतर रोहीत शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी वैयक्तिक अर्धशतकांसह तिसऱ्या गड्यासाठी ११८ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. अक्षर पटेल यानंही ४४ धावांचं मोलाचं योगदान दिल्यानं भारताला निर्धारीत ५० षटकांत ९ बाद २६४ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाच्या ॲडम झाम्पा यानं भारताचे ४ गडी बाद केले.

विजयासाठी २६५ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. २७ षटकांत केवळ १३२ धावांत त्यांचे चार गडी बाद झाले होते. मात्र मॅथ्यू शॉर्ट आणि कूपर कॉनोली यांनी दमदार अर्धशतकी खेळी करत ऑस्ट्रेलियाला विजया समीप पोहचवलं. शॉर्ट यानं ७४ तर कॉनोली यानं ६१ धावा केल्या. मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना येत्या २५ तारखेला सिडनी इथं होणार आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर सुरू असलेल्या सामन्यात भारतानं निर्धारित ४९ षटकात ३ बाद ३४०धावा केल्या आहेत. या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या भारताच्या सलामीवीरांनी द्विशतकी भागिदारीसह भारताला दमदार सुरुवात दिली. भारताच्या सलामीवीर प्रतिका रावल हीनं १२२ आणि स्मृती मंधाना हीनं १०९ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या जेमिमा रॉड्रीग्ज हीनं देखील अर्धशतक झळकावत भारताला ३०० धावांचा टप्पा पार करून दिला. ४८ षटकांचा खेळ झाला असताना आलेल्या पावसाच्या व्यत्ययामुळं, सामना ४९ षटकांचा केला गेला. गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ सामन्यांमधून ४ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश करण्याच्यादृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा आहे. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या संघानं यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे.

**<><><><><>**

क्रीडाक्षेत्रात उत्तेजक पदार्थांच्या सेवनाविरोधात स्थापन झालेल्या कॉन्फरन्स ऑफ पार्टीज ब्यूरोचे उपाध्यक्षपद पुन्हा एकदा भारताला मिळालं आहे.

**//<><><><><>//**